दाखल तारीख :– ०२/०१/२०१८
नोंदणी तारीख:– ०२/०१/२०१८
निकाल तारीख :– २४/०१/२०२०
कालावधी :– ०२व. ००म. २२दि.

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पालम यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी शैलेंद्र नं. पाटील )**

**कि. फौ. अर्ज क्र. ०१/२०१८** **निशाणी ३२**
**CNR-MHPA22-000002-2018**

१– सविता भ्र. कुशब शिंदे,
वय–२८, धंदा– घरकाम,
रा. सेलु, ह. मु. डिग्रस, ता. पालम, जि. परभणी.
२– कृष्णा पि. कुशब शिंदे,
वय–५, धंदा– निरंक,
अ. पा. क. अर्जदार क्र. १ .... **अर्जदार**

**विरूध्द**

कुशब पि. रामजी शिंदे,
वय– ३५ वर्षे, धंदा – शेती,
रा. सेलु, ता. पालम, जि. परभणी. .... **गैरअर्जदार**

..........................................................................................................

अर्जदारांतर्फे विद्वान वकील श्री. बी. बी. दुधाटे,
गैरअर्जदारातर्फे विद्वान वकील श्री. डी. यु. कुकडे,

..........................................................................................................

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक २४/०१/२०२०)

१. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५ अन्वये पोटगी मिळण्यासाठी अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की,

अर्जदार क्र. १ सविता व गैरअर्जदार कुशब याचे लग्न दिनांक २२/०४/२००८ रोजी हिंदु रितीरिवाजा प्रमाणे झाले. सदर लग्न संबंधातुन त्यांना अर्जदार क्र. २ कृष्णा हे आपत्य झाले. लग्नानंतर अर्जदार ही मौजे सेलु येथे गैरअर्जदाराकडे नांदण्यास गेली. लग्नानंतरचे सुरूवातीचे दोन वर्ष गैरअर्जदाराने तिला चांगले नांदवले व त्यानंतर अर्जदार क्र. २ कृष्णा याचे बाळांतपणासाठी अर्जदार सविता ही तिच्या माहेरी आल्यानंतर गैरअर्जदाराने तिच्या वैद्यकीय खर्चाची कोणतीही काळजी घेतली नाही व तो अर्जदार कृष्णास जन्मानंतर पाहण्यास सुध्दा आला नाही. अर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, कृष्णा याच्या जन्मानंतर अर्जदार सविताच्या आई वडीलांनी गैरअर्जदार यांना बोळवण करण्यासाठी बोलवुन घेतले व त्यांचा यथोचित मानसन्मान केला परंतु गैरअर्जदार हा सतत अर्जदारास म्हणत असे की, बोळवणीमध्ये सोन्याची अंगठी केली नाही व मानसन्मान दिला नाही म्हणुन त्रास देउ लागला.

३. अर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार हा त्याच्या आईच्या ऑपरेशनसाठी अर्जदार सविता हिस माहेरून पन्नास हजार रूपये घेउन ये म्हणुन मारहाण करून तिला उपाशी पोटी ठेवुन तिचा शारीरीक व मानसीक छळ करू लागला. आज ना उद्या गैरअर्जदाराच्या स्वभावात बदल होईल या आशेवर अर्जदार तिचे सासरी राहु लागली परंतु गैरअर्जदार व त्याच्या घरच्यांच्या स्वभावात कोणताही बदल झाला नाही व जास्तीचा त्रास देण्यास सुरूवात करून गैरअर्जदाराने अर्जदारांना सन २०१६ च्या मार्च महिन्यामध्ये माहेरी आणुन सोडले. त्यानंतर त्याने अर्जदारांच्या राहण्याची, खाण्यापिण्याची व शिक्षणाची कोणतीही सोय केली नाही. दिनांक ०४/१२/२०१७ रोजी

अर्जदार सविता हि तिच्या आई व मेहुणा यांना घेउन गैरअर्जदाराकडे नांदण्यास गेली परंतु गैरअर्जदाराने तिला हाकलुन दिले. तेव्हा पासुन अर्जदार ही तिच्या आई वडीलांकडे आश्रीतासारखे जिवन जगत आहे.

४. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदाराचा मुलगा कृष्णा हा ज्ञानदिप इंटरनॅशनल स्कुलमध्ये शिक्षण घेत असुन त्याला वार्षीक रू. १०,०००/- फीस आहे. तसेच तो सतत आजारी असल्यामुळे त्याला प्रतिमाह रू. २०००/- खर्च येतो. तसेच सदर अर्जदार सविता ही कोणताही कामधंदा करत नसल्याने तिच्याकडे कोणतही उत्पन्नाचे साधन नाही व गैरअर्जदार हा अर्जदारांना निर्वाह भत्ता देत नाही.

५. अर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदाराच्या कुटूंबात गट नं. १३८ मध्ये क्षेत्रफळ १ हे. २१ आर. सामाईक जमीन आहे. तसेच गट नं. १२५/1 मध्ये अर्जदाराच्या सासऱ्याच्या नावे १ हे. ५२ आर. व सासुच्या नावे ४० आर. शेत जमीन असुन सदर शेतीच्या उत्पन्नातुन त्यांना पाच लाख रूपये उत्पन्न असल्याने गैरअर्जदार हा अर्जदारांना प्रत्येकी रू. ५०००/- पोटगी देउ शकतो. म्हणुन अर्जदारांनी सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

६. सदर प्रकरणात गैरअर्जदारातर्फे ॲड. डी. यु. कुकडे हजर होउन त्यांचे म्हणणे नि. १२ वर दाखल केले. त्यात गैरअर्जदाराने अर्जातील नातेसंबंधातील मजकुर वगळता ईतर सर्व मजकुर नाकारला. गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदाराने तिच्या व गैरअर्जदाराच्या लग्नाची तारीख चुकीची दर्शवली. गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदार सविता ही स्वतः एका व्यक्तीसोबत निघुन गेली व तेव्हापासुन ती तिच्या आईकडे व काही दिवस आरखेड येथील एका व्यक्तीसोबत दोन ते तिन महिने आखाड्यावर राहिली. तेव्हापासुन तिचे चाल चलन बिघडले. अर्जदारास संसार करण्याची ईच्छा नसल्याने व ती व्यभीचारी असल्याने स्वतःहुन गैरअर्जदारापासुन वेगळी राहत असल्याचे नमुद केले. गैरअर्जदाराचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार सविता ही लग्नानंतर केवळ सहा महिने गैरअर्जदारासोबत राहिली व सदर लग्नातील खर्च

गैरअर्जदारांनी केला होता. अर्जदार ही गैरअर्जदारास सतत त्याच्या आई-वडीलांपासुन विभक्त राहून शहरात येण्याबाबत म्हणत असे. परंतु गैरअर्जदार हा त्याच्या आई वडीलांना सोडुन येण्यास तयार नसल्याने त्यांचे संबंध ताणले गेले. अर्जदाराचे लग्नापुर्वी त्रयस्त व्यक्तींबरोबर संबंध असल्याने ती आजही त्याव्यक्तीबरोबर पालम येथे राहुन गैरअर्जदाराकडुन पैसे उकळण्यासाठी सदरचे खोटे अर्ज दाखल करत आहे.

७. गैरअर्जदाराचे पुढे असे म्हणणे आहे की, तो स्वतः मोलमजुरी करून उपजिवीका भागवतो. तसेच अर्जदार ही गैरअर्जदारास सतत धमक्या देत असुन गैरअर्जदाराच्या जिवीतास धोका निर्माण करते. शेवटी गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदार ही शिवनकाम व शेतीच्या उत्पन्नातुन वर्षाला दहा हजार रूपये मिळवते. तसेच गैरअर्जदाराच्या वडीलांनी ४० आर. जमीन अर्जदार सविताला पोट भरण्यासाठी व घरखर्चासाठी दिलेली आहे व सदर जमीन अर्जदार ही सखाराम शिंदे यांच्यामार्फत बटईपत्राआधारे वहिती करून उपभोग घेत आहे. म्हणुन गैरअर्जदाराने सदर अर्जदार ही कोणतीही पोटगी मिळण्यास पात्र नसल्याने सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

८. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील पुराव्यावरून खालील मुद्दे निष्कर्षासहीत मी काढलेले आहेत व त्यांची खालील प्रमाणे कारणमिमांसा दिलेली आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार हे सिध्द करते काय की, गैरअर्जदाराने तिचा सबळ कारणाशिवाय निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली ? | ...होकारार्थी |
| २ | अर्जदार हे सिध्द करते काय की तिला गैरअर्जदारासोबत न राहण्याकरीता न्याय्य कारण आहे ? | ...होकारार्थी |
| ३ | अर्जदार हे सिध्द करते काय की, ती स्वतःचा निर्वाह करू शकत नाही ? | ...होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ४ | अर्जदार हे सिध्द करते काय की, गैरअर्जदाराची तिचा निर्वाह करण्याची पुरेशी ऐपत आहे ? असल्यास पोटगी किती ? | ...होकारार्थी, अर्जदार क्र. १ हिस रू. १५००/- व अर्जदार क्र. २ यास रू. १०००/- प्रतीमाह |
| ५ | आदेश काय ? | .......अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

९. अर्जदार हिने तिच्या अर्जाच्या पुष्ट्यर्थ तिचे स्वतःचे शपथपत्र नि. १५ वर व साक्षीदार क्र. २ चंद्रभागाबाई संतराम कुऱ्हे हिचे नि. १८ वर शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदाराने तिच्या अर्जापुष्ट्यर्थ मौजे सेलु येथील गट क्र. १३८/अ च्या सातबारा उताऱ्याची प्रमाणीत प्रत नि. १६ वर व मौजे सेलु येथील गट क्र. १२५/१ च्या सातबारा उताऱ्याची प्रमाणीत प्रत नि. १७. अर्जदाराने तिचा पुरावा नि. २० वर बंद केला. गैरअर्जदाराने त्याचे स्वतःचे शपथपत्र नि. २३ व गैरअर्जदारतर्फे सा. क्र. २ याचे शपथपत्र नि. २५ वर दाखल केले. सदर गैरअर्जदाराचा साक्षीदार क्र. २ गैरहजर राहिल्याने त्याचे शपथपत्र दाखल करून घेण्यात आले. गैरअर्जदारतर्फे साक्षीदार क्र. ३ सखाराम नारायण शिंदे याचा पुरावा नि. २७ वर नोंदवला. गैरअर्जदाराने त्याची पुरावा बंद पुरसीस दिली नाही व अर्जही दिला नाही म्हणुन गैरअर्जदाराचा पुरावा नि. १ वर आदेश पारित करून बंद करण्यात आला.

### मुद्दा क्रमांक १ ते ५ साठी :

१०. सविताने नि. १५ वर सादर केलेल्या पुराव्याच्या शपथपत्रात अर्जामधील सर्व

तथ्यकथने सांगीतलेली आहे. तिच्या पुराव्यास पुष्टी देण्यासाठी साक्षीदार क्र. २ चंद्रभागा हिचे पुराव्याचे शपथपत्र नि. १८ खाली दिलेले आहे. अर्जदार सविता हिच्या साक्षीत तिने तिच्या अर्जातील संपुर्ण तथ्यकथने पुन्हा नमुद केली आहे. त्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते याठिकाणी प्रेषीत करण्यात येत नाहीत. गैरअर्जदाराचा बचाव असा आहे की, अर्जदार ही सतत गैरअर्जदारास पालम येथे येउन राहण्यास म्हणत असल्याने तिच्यामध्ये व गैरअर्जदारामध्ये तणाव निर्माण झाला. तसेच अर्जदार ही स्वतःहुन एका त्रयस्त आरखेड येथील व्यक्तीसोबत पळुन गेल्याने अर्जदार ही पोटगी मागण्यास पात्र नाही. अर्जदाराने तिच्या उलटतपासात कबुल केले की, ती अर्जदार क्र. २ कृष्णाच्या उपचाराची कागदपत्र प्रकरणात दाखल केली नाहीत. तसेच तिने गैरअर्जदाराविरूध्द कौटुंबिक हिंसाचार कायद्याअंतर्गत हिंसाचार केल्याचे व दिवाणी दावा दाखल केल्याचे कबुल केले. अर्जदाराने पुढे कबुल केले की, अर्जदार क्र. २ कृष्णा हा ज्ञानदिप शाळेत शिकत असुन त्याला दरमाह रू. २०००/– खर्च येतो हे दाखवणारे कागदपत्र दाखल केले नाहीत. सदर साक्षीदाराने गैरअर्जदाराने तिला दिलेलेली शेती तिने सखाराम शिंदे याला बटईने दिल्याची बाब स्पष्टपणे नाकारली. सदर अर्जदाराच्या उलटतपासात गैरअर्जदारातर्फे सुचक प्रश्न विचारण्यात आले. ज्यास तिने नकारात्मक उत्तरे दिली.

११. अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २ चंद्रभागाबाई हिने अर्जातील तथ्यकथने पुनरोच्चारीत केली. तिच्या उलटतपासात तिने त्यांच्याकडे शेती असुन एका रूमचे घर असल्याची बाब कबुल केली. तसेच अर्जदार ही मागील तिन वर्षापासुन त्यांच्याकडे मौजे डिग्रस येथे माहेरी राहत असल्याची बाब तिने कबुल केली. तिने गैरअर्जदार याच्या आई वडीलांच्या नावे असलेल्या शेतीचा सर्वे नंबर सांगता येत नसल्याचे कबुल केले. याव्यतीरिक्त विचारण्यात आलेल्या सर्व सुचक प्रश्नांना तिने नकारात्मक उत्तरे दिली.

१२. गैरअर्जदारातर्फे स्वतः कुशब याने त्याच्या पुराव्यात त्याच्या म्हणणे मधील मजकुर पुनरोच्चारीत केला. त्याच्या उलटतपासात त्याने अर्जदारास नांदण्यास येण्याकामी नोटीस पाठवली नसल्याचे तसेच दावा दाखल केला नसल्याचे कबुल केले.

त्याने त्याच्यामध्ये, आई, वडील व भाउ यांच्यात वाटण्या झालेल्या नसल्याची बाब कबुल केली. तसेच ग्रामीण भागात पुरूषास दररोज दोनशे ते तिनशे रूपये मजुरी मिळत असल्याचे व तो दररोज मजुरीस जात असल्याचे त्याने कबुल केले. सन २००६ नंतर तो अर्जदारास आणण्यासाठी कधीही गेला नसल्याची बाब त्याने कबुल केली. तसेच सन २००६ ते सन २०१९ पर्यंत त्याने अर्जदारांच्या राहण्याची, खाण्याची व शिक्षणाची कोणतीही सोय केली नाही ही बाब कबुल केली. तसेच अर्जदार क्र. २ इंग्लीश स्कुलमध्ये शिकत असुन त्याला वार्षीक दहा हजार रूपये फीस असल्याचे व अर्जदाराची आई व भाउ मजुरी करून पोट भरत असल्याचे त्याने कबुल केले. त्याने अर्जदाराचे कोणत्या व्यक्तीसोबत संबंध होते त्याच्या विरूध्द कारवाई केली नसल्याचे कबुल केले. अर्जदार क्र. २ याच्या तब्यतीची आजतागयत चौकशी केली नसल्याचे त्याने कबुल केले. याव्यतीरिक्त विचारण्यात आलेल्या सर्व सुचक प्रश्नांना त्याने नकारात्मक उत्तरे दिली. गैरअर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २ लक्ष्मण देवीदास पवार याच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल करण्यात आले. परंतु तो हजर झाला नाही. गैरअर्जदारातर्फे साक्षीदार क्र. ३ सखाराम नारायण शिंदे याच्या पुराव्यात असे आले आहे की, तो अर्जदार गैरअर्जदार यांना ओळखत असुन अर्जदार हे गैरअर्जदाराकडे लग्नानंतर फक्त सहा महिने राहिली. अर्जदाराने सन २००७ ते २०१८ पर्यंत त्याला मौजे सेलु येथील ४० आर. जमीन बटईने दिल्याची बाब सांगीतली. तसेच अर्जदारास कोणताही आजार नसुन ती शिवणकाम करून पालम येथे राहत असल्याने तिला पोटगीची आवश्यकता नसल्याचे नमुद केले. अर्जदारातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्याने अर्जदार व त्याच्यामध्ये बटईपत्र लेखी झाले नसल्याचे कबुल केले. तसेच सदर मौजे सेलु येथील बटईने घेतलेल्या शेत जमीनीचा गट क्रमांक त्याला सांगता येत नसल्याचे त्याने कबुल केले. अर्जदार कोणत्या तारखेला, कोणत्या वर्षी गैरअर्जदाराच्या घरातुन निघुन गेली याबाबत त्याला सांगता येत नसल्याचे त्याने कबुल केले. या व्यतीरिक्त विचारलेल्या सर्व सुचक प्रश्नांना त्याने नकारात्मक उत्तरे दिली.

१३. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदाराने अर्जदाराचे सबळ कारणाशिवाय निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली का ? तसेच गैरअर्जदाराबरोबर न राहण्याकरीता तिच्याकडे न्याय्य कारण आहे का व ती स्वतःचा उदरनिर्वाह करू शकत नाही ? आणि गैरअर्जदाराची अर्जदारांचा निर्वाह करण्याची ऐपत आहे काय ? याबाबी अर्जदाराने सिध्द करणे गरजेचे आहे. वर नमुद पुराव्याचे अवलोकन केले असता प्रस्तुत अर्जदार व गैरअर्जदार यांना त्यांच्यातील नातेसंबंध मान्य आहे. अर्जदार क्र. २ हा गैरअर्जदाराचा मुलगा असल्याची बाब गैरअर्जदाराने कबुल केली. अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्न २००६ साली झाले असुन गैरअर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे सन २००६ सालापासुन अर्जदार ही माहेरी राहत आहे. एकंदरीत गैरअर्जदाराचा बचाव पाहता असे दिसुन येते की, अर्जदाराचे अनैतीक संबंध असल्याने त्यांच्यातील नात्यात तणाव निर्माण झाला होता. परंतु गैरअर्जदाराने स्वतः कबुल केले की, तो त्रयस्त व्यक्तीचे नाव सांगु शकत नाही अथवा त्याच्या विरूध्द तक्रार केली नाही. माझ्यामते कोणत्याही सबळ कारणाशिवाय पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेउन तिला माहेरी राहावे लागत आहे. यावरून गैरअर्जदाराच्या वर्तनुकीबाबत शंका निर्माण होते. तसेच गैरअर्जदार याने स्वतः कबुल केले की, तो सन २००६ पासुन अर्जदारांना आणण्यासाठी गेला नाही. तसेच त्याने अर्जदारांची कोणतीही खाण्यापिण्याची व्यवस्था केली नाही. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदाराने सदरचा अर्ज सन २०१८ साली दाखल केला आहे. परंतु ती सन २००६ पासुन माहेरी राहत असल्याचे स्वतः गैरअर्जदार कबुल करतो. गैरअर्जदाराने अर्जदारास पैश्याची मागणी केल्याबाबत नमुद केले, परंतु त्या अनुषंगाने अर्जदार ही सदर बाब सिध्द करू शकली नाही. प्रस्तुत अर्जदार ही गैरअर्जदारापासुन वेगळी राहत असल्याने व गैरअर्जदाराने तिचा निर्वाह करण्यासाठी कोणतीही सोय केली नसल्याने गैरअर्जदार हा अर्जदारास पोटगी देण्यास बांधील आहे. गैरअर्जदाराने अर्जदारावर लावलेल्या लांछणास्पद आरोपांमुळे अर्जदार माहेरी राहत असल्याची बाब अर्जदाराच्या पुराव्यावरून सिध्द होते. गैरअर्जदार अर्जदाराच्या चारीत्र्यावर संशय घेत असल्याने त्याच्यासोबत न राहण्याकरीता अर्जदाराकडे न्याय्य कारण आहे. गैरअर्जदाराने अर्जदारांची सबळ कारणाशिवाय निर्वाह करण्याची उपेक्षा केली ही बाब पुराव्यावरून सिध्द होते.

१४. सदर प्रकरणात अर्जदार ही स्वतःचा निर्वाह करू शकत नाही. ही बाब अर्जदाराने सिध्द करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने तिचे पुराव्यात ती अशक्त असल्याने कोणताही काम धंदा करत नाही असे नमुद केले. गैरअर्जदाराचा बचाव असा आहे की, अर्जदारांना पोट भरण्यासाठी व घर खर्चासाठी गैरअर्जदाराच्या वडीलांनी मौजे सेलु येथील ४० आर. जमीन दिली होती. तसेच अर्जदार ही शिवणकाम व शेतीच्या उत्पन्नातुन प्रतीवर्ष दहा हजार कमावत असल्याचे नमुद केले. अर्जदार शिवणकाम करत असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा गैरअर्जदारातर्फे दाखल करण्यात आला नाही. त्यामुळे सदर बाब गैरअर्जदार हा सिध्द करू शकला नाही. गैरअर्जदाराने अर्जदारास ४० आर. जमीन दिल्याची बाब नमुद केली. परंतु त्याअनुषंगाने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. गैरअर्जदारातर्फे सदर ४० आर. जमीन बटईने करणाऱ्या साक्षीदार क्र. ३ सखाराम यांची साक्ष नोंदवण्यात आली. परंतु सदर साक्षीदाराने त्याच्यामध्ये व अर्जदारामध्ये लेखी बटईपत्र झाले नसल्याची बाब कबुल केली. तसेच सदर साक्षीदार क्र. ३ सखाराम यास सदर बटईने केलेल्या शेताचा गट क्रमांक सांगता येत नसल्याची बाब त्याने कबुल केली. बटईने शेतीकरणाचा व्यक्तीस गट क्रमांक सांगता येत नाही, ही बाब विश्वसनीय नाही. यावरून असे दिसुन येते की, गैरअर्जदाराशी असलेल्या मित्रत्वाच्या संबंधातुन तो साक्ष देत आहे. सदर साक्षीदार हा विश्वसनीय असा साक्षीदार दिसुन येत नाही. त्यामुळे त्याच्या साक्षीवर विसंबुन राहता येणार नाही. एकंदरीत असे दिसुन येते की, अर्जदार ही कोणताही कामधंदा करत नसुन तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच अर्जदाराच्या माहेरी आर्थीक परिस्थिती ही कमकुवत असल्याचे दिसुन येत आहे. सदर बाबींचा विचार करता अर्जदार ही स्वतःचा निर्वाह करू शकत नाही ही बाब सिध्द होते.

१५. गैरअर्जदाराची अर्जदारांचा निर्वाह करण्याची पुरेशी ऐपत आहे काय या अनुषंगाने अर्जदाराच्या पुराव्यात असे आले आहे की, गैरअर्जदार हा मजुरीचे काम करत असुन त्यांच्या कुटूंबात मौजे सेलु येथे शेती आहे व सदर सेलु येथील वडीलोपार्जीत शेतीतुन त्यांना वर्षाकाठी पाच लाख उत्पन्न मिळते. त्याअनुषंगाने दाखल मौजे सेलु येथील सर्वे

नं. १२५/१ व १३८/अ च्या सातबाराचे अवलोकन केले असता सदर दोन्ही क्षेत्र हे गैरअर्जदाराच्या आई–वडीलांच्या नावे असल्याचे दिसते. सदर शेत जमीन वडीलोपार्जीत आहे किंवा स्वतः गैरअर्जदारांचे आई वडील कमावते आहे याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही. परंतु गैरअर्जदाराने स्वतः कबुल केले की तो एकत्र कुटुंबात राहत असुन त्याच्या मध्ये व आई–वडील आणि भावामध्ये वाटणी झाली नाही. त्यामुळे सदर अभिलेखावरील दाखल शेत जमीनीमधील हिस्सा गैरअर्जदारास मिळणे अपेक्षीत आहे. महत्वाची बाब म्हणजे गैरअर्जदाराने स्वतः मजुरी करत असल्याचे नमुद करून प्रतीदिन दोनशे ते तिनशे रूपये मजुरी मिळत असल्याचे कबुल केले. त्यामुळे गैरअर्जदारास प्रतिमाह अंदाजे सहा हजार ते नउ हजारच्या दरम्यान मजुरी मिळत असल्याची बाब दिसुन येते. त्यामुळे गैरअर्जदाराची अर्जदारांचा निर्वाह करण्याची ऐपत असल्याचे दिसुन येते.

१६. अर्जदार यांचा राहण्याचा, खाण्याचा तसेच अर्जदार क्र. २ च्या शिक्षणाचा विचार करता गैरअर्जदार हा अर्जदार क्र. १ हिस रू. १५००/– व अर्जदार क्र. २ यास रू. १०००/– असे एकुण रू. २,५००/– प्रतिमाह निर्वाह भत्ता अर्जदारांना देउ शकतो. केवळ अर्जदाराने गैरअर्जदाराविरूध्द कौटुंबिक हिंसाचार कायद्याअंतर्गत प्रकरण दाखल केले म्हणुन गैरअर्जदार अर्जदारास पोटगी देउ शकत नाही हा गैरअर्जदारांचा युक्तीवाद ग्राह्य धरता येणार नाही. कारण सदर कौटुंबीक हिंसाचार कायद्याअंतर्गतच्या प्रकरणात पोटगी आजतागयात मंजुर झाली नाही. याउपर प्रस्तुत प्रकरण हे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये दाखल असल्याने दोन्ही कायद्यांचा उद्वेश हा वेगवेगळा आहे. त्यामुळे गैरअर्जदारांचा युक्तीवाद ग्राह्य धरता येणार नाही.

१७. अर्जदाराने स्वतःसाठी व अर्जदार क्र. २ साठी गैरअर्जदाराकडुन प्रत्येकी पाच हजार रूपये दरमाह मागीतले आहे. परंतु उभयपक्षकारांचा सामाजीक दर्जा व त्यांच्या गरजा आणि आज रोजी जिवनावश्यक वस्तुंच्या वाढलेल्या किंमती विचारात घेउन मुद्दा क्र. १ ते ४ उत्तर होकारार्थी नोंदवुण मुद्दा क्र. ५ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१– अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२– गैरअर्जदार कुशब रामजी शिंदे याने अर्जदार सविता कुशब शिंदे हिस प्रतिमाह रू.१५००/– ( रूपये एक हजार पाचशे केवळ ) व अर्जदार क्र. २ कृष्णा पि. कुशब शिंदे यास प्रतिमाह रू.१०००/– ( रूपये एक हजार केवळ ) पोटगी अर्ज दाखल दिनांक ०२/०१/२०१८ पासुन द्यावी.

३– अर्जाच्या खर्चापोटी गैरअर्जदार कुशबने अर्जदार सविता हिला रू. १०००/– खर्च निकाल दिनांकापासुन तीस दिवसांच्या आत द्यावा.

४– सदर आदेशाची प्रत पक्षकारांना विनामुल्य देण्यात येते.

Shailendra Nandkishor Patil
Digitally signed by Shailendra Nandkishor Patil
Date: 2020.01.30 11:46:22 +0530

( शैलेंद्र नं. पाटील)

दिनांकः– २४/०१/२०२० न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पालम.